# नागपूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसंग्रामातील सविनय आंदोलन चळवळीत उपेक्षित नायिकांची भूमिका : एक ऐतिहासिक अध्ययन

**जयंत नारनवरे**
संशोधक
इतिहास विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रा. डॉ. प्रज्ञा कामडी**
मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.121

---

***सारांश :***

*सविनय कायदेभंग चळवळीने भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला निर्णायक वळण दिले. या चळवळीत देशभरातील पुरुषांसोबत महिलांनी देखील सक्रिय सहभाग घेतला. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये नागपूर जिल्ह्यातील सविनय आंदोलन चळवळीत सहभागी झालेल्या उपेक्षित स्वातंत्र्यनायिकांची भूमिका ऐतिहासिक स्रोतांच्या आधारे अभ्यासण्यात आली आहे. या उपेक्षित स्वातंत्र्य नायकांनी सत्याग्रह, भूमिगत कार्य, प्रभातफेऱ्या, संदेशवाहन, निधी संकलन व ब्रिटिश सत्तेविरुद्ध निदर्शनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. नागपूर जिल्हा गॅझेटियर, स्वातंत्र सैनिक चरित्रकोश महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग खंड २, सरकारी अभिलेख व दुय्यम संशोधन साहित्य यांच्या आधारे या अभ्यासात उपेक्षित स्वतंत्र नायिकांची ओळख करून देण्यात आली आहे.*

**बीजसंज्ञा :** सविनय आंदोलन चळवळ, नागपूर जिल्हा, उपेक्षित स्वातंत्र्यनायक, स्वातंत्र्यसंग्राम, स्थानिक इतिहास, पहिली

---

**प्रस्तावना :**

१९30-32 ची सविनय कायदेभंग चळवळ ही गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली जनआंदोलनात्मक चळवळ होती. या आंदोलनात पुरुषांसोबतच महिलांनी घरगुती चौकटीबाहेर पडून थेट ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले.

नागपूर जिल्हा हा स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रदेश होता. १९२० च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनानंतर या जिल्ह्यात राष्ट्रवादी विचारांना बळ मिळाले. तथापि, इतिहासलेखनात नागपूर जिल्ह्यातील बहुतांशी सत्याग्रहींचा उल्लेख अत्यल्प प्रमाणात आढळतो.

या पार्श्वभूमीवर, नागपूर जिल्ह्यातील चलेजाव चळवळीत सहभागी झालेल्या उपेक्षित नायकांचे योगदान शोधून काढणे, त्यांचे कार्य अधोरेखित करणे व इतिहासाच्या मुख्य प्रवाहात त्यांना स्थान देणे, हे प्रस्तुत

संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**1932 ची कायदेभंगाची पहिली चळवळ :**

31 डिसेंबर 1929 पूर्वी वसाहतीचे स्वराज्य काँग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केला होता. असंतोषाला वाट करून द्यावी याचा गांधीजी विचार करत होते. सर्व जनता पुढे होणाऱ्या स्वातंत्र्य संघर्ष साठी तयार होती. अशा स्थितीत 26 जानेवारी 1930 रोजी हा स्वातंत्र्य दिन म्हणून काँग्रेसने निश्चित केला. कांग्रेस कमिटी ने स्वातंत्र्याचा संदेश प्रस्तुत करण्याचे आज्ञा केली. काँग्रेसच्या आदेशाला अनुसरून विदर्भात सर्वत्र स्वातंत्र्याचा ठराव वाचण्यात आला. शेवटी गांधीजींनी 30 मार्च रोजी सुप्रसिद्ध दांडी मार्चला प्रारंभ केला. गांधीजी साबरमती आश्रमापासून गुजरातच्या सीमेवर समुद्रकिनारी वसलेल्या दांडी या खेड्यापर्यंत पायी निघाले. या खेड्यात जाऊन तिथे मिठाचा कायदा तोडायचा गांधीजींचा कार्यक्रम होता. पाहता पाहता गांधीजींच्या यात्रेत हजारो लोक सामील झाले. दांडी या ठिकाणी मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. अशा रीतीने कायदेभंगाच्या चळवळीला प्रारंभ झाला. प्रत्येक प्रांतात क्रांतिकारी कार्यकर्ते या चळवळीच्या तयारीला लागले. दांडी यात्रा प्रत्यक्ष सुरु होणे पूर्वी असंतोष किती जबरदस्त याची कल्पना ब्रिटिश सरकारला आलेली नव्हती. परंतू जसा मिठाच्या सत्याग्रहाला दांडी पासून प्रारंभ झाला आणि ही चळवळ इतर प्रांतात सुद्धा सुरू झाली.

मार्च महिन्यात प्रांतिक विदर्भात प्रत्येक जिल्ह्यातील घोषणा होऊन सर्वत्र मिठाच्या सत्याग्रहाला प्रारंभ झाला. मार्च महिन्यात काँग्रेस कमिटीने पहिला युद्ध कमिटीची घोषणा केली विदर्भात या कमिटीचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी सेक्रेटरी ब्रिजलाल बियाणी हे होते. नागपूरच्या युद्ध कमिटीत बॅरिस्टर अभ्यंकर हे अध्यक्ष आणि सेक्रेटरी डॉक्टर ना भा खरे हे होते. याशिवाय भगवान दिन सेठ जमनालाजी बजाज निळकंठ राव देशमुख शेठ पूनम चंद्रका इत्यादी सदस्यांचा अंतर्भाव होता. या सगळ्यांनी प्रांतभर दौरे काढले.ठिकठिकाणी युद्धमंडळ स्थापन झाली. व स्वयंसेवक नोंदण्यास प्रारंभ झाला अशा रीतीने नागपूर विदर्भात कायदेभंगाच्या चळवळीची पूर्ण तयारी झाली. व नागपूर विदर्भात मिठाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सशस्त्र मार्गाने लढा देऊन इंग्रज अधिकाऱ्यांच्या हत्या किंवा बॉम्बस्फोट करून देश स्वतंत्र होणे अशक्य होते. त्यामुळे सत्य अहिंसा वर आधारित सगळ्यांनी कायदेभंग चळवळ उभारण्यात आली. या चळवळीची सुरुवात मिठाचा सत्याग्रह करून करण्यात आली.भारतात तयार होणाऱ्या मिठाची इंग्लंडमधून आयात,निर्मितीवरील निर्बंध,वजन कमी कर याविरुद्ध आंदोलन बंद करण्यासाठी ६ एप्रिल 1930 पासून साबरमती आश्रम ते दांडी पदयात्रा काढण्यात आली.

25 दिवस चाललेल्या यात्रेदरम्यान गुजरात, मुंबई शहर, महाराष्ट्र, बिहार राज्यात विशेष जोर होता. या जन आंदोलनात पुरुषाच्या बरोबरीने महिलांनी देखील मोठ्या संख्येने भाग घेतला. पुरुष सत्याग्रहीना अटक झाल्यानंतर महिला स्वातंत्र्यसैनिकांनी स्वदेशीचा पुरस्कार, परदेशी मालाच्या दुकानासमोर निदर्शने, दारूच्या दुकानांसमोर निदर्शने या चळवळी सुरू केल्या.

**1932 ची कायदेभंगाची दुसरी चळवळ :**

1930 च्या पहिल्या कायदेभंगाच्या चळवळीत जवळजवळ 6000 लोकांना तुरुंगात ठेवण्यात आले

तसेच 103 लोकं यात गोळीबारात मृत्यूमुखी पडले. ब्रिटिश सरकारने कुठली दया मायां न दाखविता लाठीमारांनी फटक्यांच्या शिक्षा सत्याग्रहींना दिल्या. संप आणि ब्रिटिश मालावरील बहिष्कार यामुळे ब्रिटिशांच्या व्यापारावर याचा मोठा आर्थिक परिणाम होऊन अर्थव्यवस्था डबघाईस आली. कायदेभंगाची चळवळ बंदुकीच्या म्हणजे शस्त्राच्या साह्याने दडपून टाकणे अशक्य आहे याची सरकारला जाणीव झाली आणि म्हणूनच देशाचा स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्याकरता निरननिराळ्या राजकीय पक्षांशी वाटाघाटी करणे ब्रिटिश सरकारला आवश्यक वाटू लागले. तिथूनच नोव्हेंबर 1930 मध्ये लंडनला पहिली गोलमेज परिषद झाली. या परिषदेत काँग्रेस पक्षाने सहभाग घेतला नाही काँग्रेस चा सहभाग असल्याशिवाय कुठलाच प्रश्न मार्गी लागणे शक्य नाही ब्रिटिशांनी ओळखून काँग्रेसची समूहचाराचे धोरण स्वीकारले व त्यातूनच 5 मार्च 1931 रोजी गांधी आयर्विन करार अस्तित्वात आला. या करारानुसार काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेत सामील होण्यासाठी महात्मा गांधी लंडनला गेले. परंतु ही गोलमेज परिषद ही अपयशी ठरली. त्यामुळे एक जानेवारी 1932 रोजी काँग्रेसने पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. महात्मा गांधींनी ही चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतल्यावर पण नागपूर व आसपासच्या परिसरातील स्वयंसेवकसज्ज झाले.

नागपुरात 4 जानेवारी 1932 पासून सभांना प्रारंभ झाला बॅरिस्टर अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली एक युद्धमंडळ नेमण्यात आले. प्रभात फेऱ्या झेंडावंदन सभा विदेशी मालावर व दारू दुकानांवर पिकेटिंग चालू झाले. 10 जानेवारी रोजी टिळक विद्यालय काँग्रेस कार्यालय व असहयोग कायदा म्हणून घोषित करण्यात आला. टिळक विद्यालयात पोलीस भारापासून 64 स्वयंसेवक व दहा स्वयंसेवी अटक करण्यात आली. निशस्त्र लोकांवर ब्रिटिशांकडून लाठी चार्ज सुरू झाला. 15 जानेवारीपर्यंत नागपूरचे जवळपास 128 काँग्रेसचे कार्यकर्ते तुरुंगात टाकण्यात आले. 26 जानेवारी 1932 रोजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्य दिन साजरा होत असताना त्यांनाही अटक करण्यात आली. पटवर्धन मैदानावर सौ. गंधे,सौ कानेटकर,सर्वस्वी टिकेकर, छत्रे,हेर्लेकर,घाटे यांना अटक करण्यात आली. याचवेळी सर्वश्री दातार सहस्त्रबुद्धे आप्पाजी गांधी वाचा सुंदर गजानन दांडिके शंकर काळीकर या या 47 स्त्री-पुरुषांना अटक झाली. सरकारने दडपशाही चालविली तरी सरकारच्या विरोधाला न जुमानता कायदेभंगाची चळवळ नागपूर व परिसरात चालूच राहिली.

**सविनय कायदेभंग चळवळीतील उपेक्षित स्वातंत्र्य सैनिक :**

**जयराम तुकाराम अकूज :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण. 1932 साली जंगल चा कायदा मोडला त्याबद्दल चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**अग्रवाल चेतनदास दीनानाथ :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. बी. ए., एल. एल. बी पर्यंत शिक्षण. 1930 च्या कायदेभांग चळवळीत कायदे मोडण्याचा प्रचार केला तसेच 1932 च्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला त्यासाठी त्याना चार व

सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**मोतीलाल गणेश लाल अजमेरा :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता आठवी पर्यंत शिक्षण. 1930 व 1932 साली झालेल्या कायदेभंगच्या चळवळीत सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**मारोती तुकाराम आदमने :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण. 1932 सालच्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला त्याबद्दल तीन महिने सक्त मजुरी ची शिक्षा झाली.

**अभयंकर मोरेश्वर वासुदेव :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. नागपूर प्रांतातील स्वातंत्र्य. 1930 साली झालेल्या स्वातंत्र्य चळवळीत राजद्रोहच्या आरोपाखाली दोन वर्ष सक्त मजुरीची व दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली.

**सदाशिव सीताराम अंबुलकर :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता मॅट्रिक पर्यंत शिक्षण. 1932च्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला.त्याबद्दल सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**शंकर गोविंद अलोनी :**

मुळचे रामटेक जिल्हा नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण.1932च्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला. त्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची व 50 रुपये दंड अशी शिक्षा झाली.

**नत्थू मटरू अहिर :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण. 1930 च्या कायदेभंग चळवळीत दारू गुत्त्यावर पिकेटिंग केल्या बद्दल 9 महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**मंचरशा आवारी :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण. शस्त्र सत्याग्रह चळवळीचे जनक. 1930 मध्ये सरकार विरोधी प्रचार केला सहा महिने सक्त मजुरी ची शिक्षा.

**पुरुषोत्तम अंबादास आंबेकर :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी.शिक्षण मॅट्रिकुलेट. 1932 च्या सत्याग्रह चळवळीत कायदे मोडण्याचा प्रचार केल्या बद्दल सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**राजेश्वर धुंडीराज आंबेकर :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. शिक्षण मॅट्रिकुलेट. 1930 च्या चळवळीत दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले. तसेच 1932 साली जंगल चा कायदा मोडला त्याबद्दल तीन व सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**गनपत कृष्णाजी आंबेकर :**

मुळचे सावनेर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण.1930च्या कायदे भंग चळवळीत सरकारी कायदे मोडण्याचा प्रचार केल्या बद्दल व बेकायदा कॉंग्रेस चळवळीत सामील असल्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**इंगळे किसन तात्याजी :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. 1930 च्या चळवळीत दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले.त्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची व 50 रुपये दंड अशी शिक्षा झाली.

**आंनद नीलकंठ उधोजी :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण. 1930 च्या चळवळीत दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले.त्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**गंगाराम मल्याजी कटकमवार :**

मुळचे रामटेक जिल्हा नागपूर येथील राहिवासी.ते निरक्षर होते. 1930 च्या कायदेभंग चळवळीत पटवारीची नोकरीं सोडून स्वतः ला प्रचार कार्यात वाहून घेतले. त्याबद्दल एक वर्ष व 1932 सालच्या सत्याग्रह च्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला.त्याबद्दल सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**शंकरराव गंगाराम कटकमवार :**

मुळचे रामटेक जिल्हा नागपूर येथील राहिवासी. शिक्षण इयत्ता पाचव्या इयत्ता पर्यंत.1930 च्या चळवळीत दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले त्याबद्दल सहा महिने आणी 1932 ला सत्याग्रह चळवळीत जंगल चा कायदा मोडला. व कायदेभंग चा भाषणा द्वारे प्रचार केला. त्याबद्दल सहा महिने व पंधरा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. तसेच 1932 साली 75 हजार रुपये दंड सुद्धा झाला.

**शंकर जयराम कलमकर :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी.इयत्ता सातवी पर्यंत शिक्षण. 1932 साली झालेल्या कायदेभंगच्या चळवळीत नऊ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**कलाल विठोबा जिनबाजी :**

मुळचे नागपूर येथील राहिवासी.इयत्ता तिसरी पर्यंत शिक्षण. 1932 सालच्या सत्याग्रह च्या चळवळीत जंगल चा कायदा मोडला.त्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची व 50 रुपये दंड शिक्षा झाली.

**काची सुभा दिनु :**

मुळचे सावनेर जिल्हा नागपूर येथील रहिवासी. त्यांचे शिक्षण इयत्ता चौथ्या वर्गापर्यंत झालेले होते.1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला व कायदेभंगाचा प्रचार केला त्याबद्दल त्यांना नऊ महिने सक्त मंजुरीची शिक्षा झाली.

**माधव जनार्दन कानिटकर :**

नागपूर येथील रहिवासी त्यांचे शिक्षण बीएपर्यंत झालेले होते 1930 सालच्या स्वातंत्र्य चळवळीत कायदेभंगाचा प्रचार केला त्याबद्दल त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**गंगाराम रामजी कामठीकर :**

मुळचे नागपूर येथील रहिवासी त्यांचे शिक्षण इयत्ता चौथ्या वर्गापर्यंत झालेले होते 1930 सालच्या स्वातंत्र्य चळवळीत जंगलचा कायदा मोडला त्याबद्दल त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली .

**रामा सोमा कारागीर :**

मुळचे नागपूर येथील रहिवासी त्यांचे शिक्षण इयत्ता चौथ्या वर्गापर्यंत झालेले होते. १९३० सालच्या चळवळीत दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले त्याबद्दल त्यांना सहा महिने फक्त मजुरीचे शिक्षा झाली.

**शंकर विष्णू काळीकर :**

मुळचे नागपूर येथील रहिवासी त्यांचे शिक्षण येता चौथ्या वर्गापर्यंत झाले होते कायदेभंग करण्याचा प्रचार केल्यामुळे 1930 व 1932 साली त्यांना प्रत्येकी सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**अडकू सिंग नारायण सिंग कुईकी :**

मुळचे काटोल जिल्हा नागपूर येथील रहिवासी त्यांचे शिक्षण इयत्ता चौथ्या वर्गापर्यंत झालेले होते 1930 च्या स्वातंत्र्य चळवळीत जंगलचा कायदा मोडला त्याबद्दल त्यांना सहा महिने फक्त मजुरीची शिक्षा झाली.

**निष्कर्ष :**

सविनय कायदेभंग चळवळीचे फार दूरगामी परिणाम घडवून आले. या कायदेभंगामुळे सामान्य माणसाला सरकार बद्दलची भीती वाटत होती ती भीती अजिबात नाहीसी झाली ब्रिटिश सरकार बद्दलचा खेडोपाडी धाक होता.कायद्याबद्दल आदर होता गांधीजींच्या या कायदेभंगाच्या चळवळीमुळे सर्वसामान्य मनुष्य निर्भय बनला. जनतेत आत्मविश्वास वाढला. या आंदोलनाचे आणखी एक फलनिष्पत्ती म्हणजे अधिकाधिक

जनता राष्ट्रीय प्रवाहात आली. 1930 32 च्या या कायदेभंगाच्या आंदोलनात बहुजन समाज सामील झाला. काँग्रेस पक्ष जनआंदोलनाचे एक प्रतीक बनला.

**संदर्भ सूची :**


- स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग खंड १ ला
- फाटक न. र.(२०१२). भारतीय स्वातंत्र्य आंदोलन समिती, महाराष्ट्र राज्य, मुबंई.
- कोलारकर श. गो.,आधुनिक विदर्भाचा इतिहास, 1885 ते 1947, पृष्ठ 131,150
- कानेटकर मा. ज., नागपूर प्रांतचा इतिहास, कांग्रेस सुवर्ण जुबली ग्रंथ
- डाँ वक्कानी, आधुनिक विदर्भ का इतिहास (1885 ते 1947)
- झोड अनिल श्याम, नागपूर विद्यापिठाच्या एम फिल डिग्री करिता मान्यता प्राप्त लघुनिबंध, सविनय कायदेभंगाची चळवळ आणी त्यात विदर्भाचा सहभाग (1930)
- गेडाम शंकरराव, नागपूर जिल्ह्याचा इतिहास.
- पाठक अरुणचंद्र श. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर,नागपूर जिल्हा भाग 1,दर्शनीका विभाग महाराष्ट्र शासन मुंबई 2005,पृष्ठ 221 ते 226